# ४. ऐच्छिक उपक्रम

## (अ) उत्पादक क्षेत्रे

## (१) क्षेत्र : अन्न

### १.१ परसातील बागकाम

• परिसरातील निरनिराळ्या ठिकाणी भेटी देऊन तेथील झाडांचे, रोपांचे निरीक्षण करणे.






### माझी कृती

• परिसरात रोपांची लागवड.





◆ परिसरात आढळणाऱ्या झाडांची माहिती द्यावी. परिसरात रोपांची लागवड करून घ्यावी.

## १.२ कुंडीतील लागवड

### विविध कुंड्यांचा परिचय



मातीची कुंडी



लाकडी कुंडी



प्लॅस्टिक कुंडी



सिमेंटची कुंडी




चिनी मातीची कुंडी



धातूची कुंडी


## माझी कृती

**रंग भरा.**



◆ विविध प्रकारच्या, माध्यमांच्या कुंड्यांचा परिचय करून द्यावा.

## रोपवाटिकेला भेट







## माझी कृती

**कुंडीमध्ये रोप लावण्याची कृती क्रमाने सांगा.**





◆ परिसरातील रोपवाटिकेला भेट द्यावी. रोप लावण्यासाठी कोणकोणत्या वस्तूंचा वापर केला जातो याची माहिती द्यावी.

## कुंडीत रोप लावणे



### माझी कृती

**रोपवाटिकेतील आवडलेल्या पानाफुलांची चित्रे काढा.**

◆ घरातल्या वस्तूंपासून छोट्या कुंड्या तयार करून त्यात रोपे लावण्याविषयी माहिती द्यावी. उदा. आईस्क्रीमचे कप, रिकामे डबे इत्यादी.

## १.३ फळप्रक्रिया

### (अ) विविध फळे.



### माझी कृती


**फळांची चव सांगा.**















- चित्रांतील फळांची नावे,चव व फळांचे उपयोग विचारावेत.

## (ब) फळे पिकणे









◆ कच्च्या व पिकलेल्या फळांची चव, रंग यांची माहिती विचारावी.

## १.४ मत्स्य व्यवसाय

### खाऱ्या पाण्यातील मासे





### गोड्या पाण्यातील मासे





### निमखाऱ्या पाण्यातील मासे





## माझी कृती



- मासळी बाजारास भेट देऊन निरीक्षण करावयास सांगावे.
- खाऱ्या पाण्यातील मासे- सरंगा, सुरमई इत्यादी.
- गोड्या पाण्यातील मासे- कटला, मृगळ (मरळ), रोहू इत्यादी.
- निमखाऱ्या पाण्यातील मासे- चनोस, मुलेट इत्यादी. या माशांची माहिती सांगावी.

## (२) क्षेत्र : वस्त्र

### २.१ वस्त्रनिर्मिती

#### (अ) संवाद

(आजी कापूस स्वच्छ करत आहे. आर्या, श्वेता, शुभम व संकेत येतात.)



श्वेता : आजी! तू काय करते आहेस? आम्हांला गोष्ट सांग ना!

आजी: तुम्ही मला कापूस स्वच्छ करायला मदत करता का? मग मी गोष्ट सांगेन.

मुले : होऽ! काय करायचं?

आजी : या कापसातली सरकी, काड्या, वाळकी पानं काढायची, हा घ्या कापूस...

(मुले कापूस घेऊन तो स्वच्छ करतात.)

आजी : शाब्बास मुलांनो! चला, आता मी तुम्हांला छान गोष्ट सांगते.




## (आ) कथाकथन

एका जंगलात निरनिराळे प्राणी रहात होते. ते एकमेकांना मदत करायचे. माणसे जंगलातली झाडे तोडत असल्याने त्यांना भीती वाटू लागली. ते सगळे एका ठिकाणी जमून विचार करू लागले. तोच एक हरणाचे पाडस धावत आले. ते खूप घाबरले होते.

त्याची आई विचारू लागली, ''बाळा! काय झालं?'' पाडस म्हणाले, ''आई गं! मी आज कधीही न पाहिलेला एक प्राणी पाहिला. तो इकडे तिकडे फिरत होता. थोड्या वेळाने त्याने आपल्या अंगावरील काहीतरी ओढून काढलं आणि ते झाडाला टांगून तो झाडाखाली झोपला.''

ते ऐकून माकड म्हणाले, "अरे ! तो प्राणी म्हणजे माणूस. तो खूप हुशार आहे. माणूस कापूस पिकवतो, त्याची काळजी घेतो, कापसाचं सूत काढतो. त्याचे कपडे तयार करून अंगात घालतो आणि थंडी, वारा, पाऊस यांपासून स्वतःचं संरक्षण करतो."



◆ कथेचे संवादात रूपांतर करून त्याचे नाट्यीकरण करून घ्यावे.

## (इ) गाणे



आईची साडी लाल लाल
हळूच पुसते बाळाचे गाल
ओले झबले काढून टाकले
पंचाने अंग पुसून काढले ॥१॥



आजीचे पातळ मऊ मऊ
गोधडी करून झोपून जाऊ
छान छान फ्रॉक घालते ताई
गणवेश घालून शाळेत जाई ॥२॥



धोतर नेसतात आजोबा
शर्ट-पँट घालतात बाबा
दादा घालतो शर्ट नवा
मला पण तसाच शर्ट हवा ॥३॥



## माझी कृती

चित्र काढा.

शर्ट पँट फ्रॉक

◆ वरील गीत तालासुरात म्हणून घ्यावे.

## २.२ प्राथमिक शिवणकाम

### १. कापडाच्या दुकानास भेट



### २. कापडाच्या विविध प्रकारांची ओळख

**तक्तावाचन करून कापडाचे नमुने चिकटवावेत.**

| कापडाचा प्रकार | उपयोग | कापडाचा स्पर्श व गुण | नमुना |
|---|---|---|---|
| सुती कापड | धोतर, साडी, पंचा, गणवेश, लहान मुलांचे कपडे, चादरी, टोपी इत्यादी. | मऊ, उबदार घाम शोषून घेते. | |
| रेशमी कापड सॅटिन, मखमल इत्यादी. | साडी, ड्रेस (मुलींचे), शर्ट, नाटकातील कपडे | चमकदार गुळगुळीत | |
| लोकरी कापड | स्वेटर, शाल, मफलर, कानटोपी, मोजे इत्यादी. | खरखरीत, मऊ उबदार | |


## २.३ बाहुलीकाम

### (अ) खेळण्यातील बाहुल्यांचा संग्रह




### ब) हातरुमालापासून बाहुली.





- खेळण्यातील उपयोगी साहित्य वापरून बाहुली तयार करून घ्यावी.
- साहित्य व साधने : हातरुमाल, चेंडू, दोरा, रंग साहित्य, सजावट साहित्य इत्यादी.
- लहानसे प्रदर्शन आयोजित करावे.

## २.४ काथ्याचे विणकाम



### नारळाचे झाड

नारळाचे झाड उंच असते. झाडाला एकही फांदी नसते. वरील टोकाकडे लांबलचक पानांचा झुपका दिसतो. त्या पानांना झावळ्या म्हणतात.

झावळीच्या खाचेत नारळ लटकलेले असतात. नारळाच्या झाडाला माड असेही म्हणतात. माडाचे खोड गोलाकार, पांढरट तपकिरी रंगाचे असते.

एका झाडापासून वर्षाला साठ ते ऐंशी नारळ मिळतात. नारळ तयार होण्यास बारा ते तेरा महिने लागतात.

## माझी कृती

**निरीक्षण करा.**






◆ शक्य असल्यास नारळाच्या बागेस भेट देऊन झाडाचे भाग समजावून द्यावेत.

# ३. क्षेत्र : निवारा

## ३.१ मातकाम


### (अ) माती चाळणे



### (ब) माती भिजवणे



### (क) मातीचे विविध आकार तयार करणे





## माझी कृती



- माती चाळणे, माती भिजवणे, मातीचे आकार तयार करणे या कृतींविषयी मार्गदर्शन करावे.
- शक्य असल्यास मातकाम कारागिराची भेट घेऊन प्रत्यक्ष अनुभव द्यावा.

## ३.२ बांबूकाम व वेतकाम

- **बांबूप्रदर्शनास भेट**



### माझी कृती



**बांबूपासून तयार केलेल्या वस्तूंची चित्रे काढा.**

- चित्राद्‌वारे बांबूचे उपयोग समजावून द्यावेत.

## ३.३ फुलझाडांची व शोभिवंत झाडांची लागवड

### १. वासाची व बिनवासाची फुले.



## माझी कृती

- फुलांचा हार  किंवा गुच्छ तयार करणे.





- निरनिराळ्या फुलांच्या पाकळ्या, झाडांची पाने गोळा करून ती वहीत सुकण्यास ठेवावी व सुकल्यावर चिकटवण्यास सांगावे.
- गुलाब, अबोली, जास्वंद, कर्दळी, झेंडू, मोगरा, शेवंती, निशिगंध इत्यादी फुलांचे रंग व नावे ओळखण्यास सांगावे.

## (क) इतर क्षेत्रे

### शेतीपूरक व्यवसाय (पशुपक्षी संवर्धन)

### चित्र शब्दकोडे सोडवणे






| | | | | |
|---|---|---|---|---|
| कों | | डी | | |
| | | | म्है | |
| | री | | | सा |
| | | | बै | |
| | | स्व | | |





- चित्र शब्दकोडे म्हणजे काय हे मुलांना समजून सांगावे. प्राण्यांची माहिती देऊन पाळीव प्राणी व त्यांचे उपयोग सांगावेत.
- चित्रावरून मुलांना प्राण्यांची नावे विचारावीत व त्यानुसार चित्र शब्दकोडे पूर्ण करून घ्यावे.

N4AL1G